पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८.
जा. क्र. काक/३/ २३३ /२०२०.
दिनांक:- ११/०८/२०२०.

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,
पिंपरी – १८.

विषय :- कंत्राटी कामगारांचे किमान वेतनदराबाबत.
संदर्भ :- १. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्रमांक . काक/३/कावि/ ९४/२०२० , दिनांक १२/०२/२०२०.
२. मा. कामगार आयुक्त ( ग्रा. वि.)मुंबई यांचेकडील क्र. ग्रा. वि./ कि.वे.अ/२०२०-२/ कार्या – १० /४१९६ दिनांक - ०५/०८/२०२०.

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भीय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगारांचे तसेच महानगरपालिकेमाठी सेवा देणाऱ्या कंत्राटदारामार्फत नेमणेत आलेल्या कंत्राटी कामगारांचे दिनांक ०१/०१/२०२० पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित करणेत आले आहे . सदर आदेशामध्ये दर सहा महिन्याकरिता प्रसिध्द होणाऱ्या विशेष भत्याचे दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे व त्याप्रमाणे संबधीत विभागानी किमान वेतनदराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे .

उक्त संदर्भीय क्र. २ दिनांक ०१/०७/२०२० ते ३१/१२/२०२० या कालावधीतील विशेष भत्याचे दर प्राप्त झाले आहेत . सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू

( प्रमोद जगताप )
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८.

Scanned with CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे
(कालावधी - दिनांक ०१/०७/२०२० ते ३१/१२/२०२०)
मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२०दिनांक १२/०२/२०२० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून

जा. क्र. काक/३/कावि/२३/२०२० दिनांक १७/०८/२०२० चे लगत

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ५४९५.०० | १९४९५.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ५४९५.०० | १८४९५.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ५४९५.०० | १६९९५.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. ( एकूण वेतन र.रु. १५०००/- पर्यंतच देय ) | १३% |
| ३ | ई.एस.आय. (१ + २ + घरभाडे ५% यावर) | ३.२५ % |
| ४ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ५ | रजा वेतन (१ + २ यावर) | ५.७७% |
| ६ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | रु. ६/- |
| ७ | सेवा शुल्क (१ + २ यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

वरीलप्रमाणे मनपातील सर्व कंत्राटी कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रसाद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

C:\Users\Admin\Desktop\Kiman Vetan Rate-01-01-19 - 31-06 19.docx

Scanned with CamScanner